**BDC LIBRARY**
**News Paper Clipping**
**A.Y. 2025-26**

# पाटणमध्ये २८ ते २ मार्च कालावधीत पाटण महोत्सव

## पाटण महोत्सव : शेती, उद्योग, आणि परिसरातील स्थानिक उत्पादनांचा भव्य संगम

सुरेश संकपाळ

पाटण : येथे कोयना एजुकेशन सोसायटी पाटण, बा. दे.कॉलेज, पाटण आणि रोटरी क्लब पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने २८ फेब्रुवारी , १मार्च आणि २मार्च या दिवशी पाटण महोत्सव साजरा होत आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून शेतकरी, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांना शेती, उद्योग, नवउर्जा व स्थानिक उत्पादनांची प्रत्यक्ष माहिती मिळणार असून खरेदी-विक्रीसाठी एकाच ठिकाणी नवीन उधोजाकाना, विद्यार्थी यांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध होणार असल्याची कोयना एजुकेशन सोसायटीचे संचालक याज्ञसेन पाटणकर आणि संजीव चव्हान यांनी दिली.

यावेळी संयोजन समितीचे चेअरमन डॉ विलासराव कळंत्रे , समन्वयक डॉ हेमलता काटे , सदस्य रो. जगदीश शेंडे, सचिव विजय काटे सदस्य डॉ दीपक पाटील, डॉ विनायक राउत . डॉ संतोष पाटील..डी डी थोरात, शिवहर आंबेगावे, अनिल पाटील विनायक माथने ,सतीश गायकवाड उपस्थित होते. या महोत्सवात भात, नाचणीसह विविध धान्यांचे प्रदर्शन आणि थेट विक्रीची व्यवस्था करण्यात आली आहे. सुधारित बियाणे, सेंद्रिय शेती, काढणी-पश्चात प्रक्रिया आणि बाजारपेठेतील संधींबाबत मार्गदर्शन मिळणार आहे. स्थानिक शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनांची थेट विक्री करता येणार असल्याने मध्यस्थांचा खर्च कमी होऊन उत्पन्नवाढीचा मार्ग खुला होणार आहे.

आधुनिक शेती अवजारे, लघुउद्योगांतील नावीन्यपूर्ण उत्पादने आणि सौरऊर्जा उपाययोजना यांचे सादरीकरण येथे पाहायला मिळेल. खर्च कमी करून उत्पादन वाढविणारे पर्याय, सोलर पंप-पॅनल्ससारखी तंत्रे, तसेच ग्रामीण उद्योजकतेला चालना देणारी उत्पादने यामुळे शेतकरी व नवउद्योजकांना प्रत्यक्ष माहिती व व्यवहार्य पर्याय मिळणार आहेत. महिला बचत गटांनी तयार केलेली हस्तकला, घरगुती प्रक्रिया-उत्पादने, मसाले, पापड-लोणची यांसह विविध वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्री येथे होणार आहे. त्याचबरोबर स्थानिक चवीचे खाद्यपदार्थ नागरिकांना चाखायला मिळणार असून दर्जेदार स्थानिक उत्पादनांना थेट बाजारपेठ मिळेल.

पाटण महोत्सवचा उद्देश शेती-उद्योग-नवउर्जा-स्वयंरोजगार या सर्व घटकांना एकत्र जोडून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणे हा आहे. माहिती, तंत्रज्ञान आणि बाजारपेठ यांचा सेतू उभारून शेतकरी व उद्योजकांचे उत्पन्न वाढवणे, तसेच नागरिकांना विश्वासार्ह व दर्जे दार स्थानिक उत्पादने उपलब्ध करून देणे-हीच या महोत्सवाची खास ओळख ठरणार आहे. नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून प्रदर्शनाला भेट द्यावी, खरेदी-विक्रीत सहभागी व्हावे आणि या लोकाभिमुख उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.